## प्रेसनोट दि.३/११/२०१७

## सामाजिक सुरक्षा विभागाकडुन छापा टाकुन एक अल्पवयीन व एक सज्ञान मुलीची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन १ आरोपी महिलेस अटक

दि.२/११/२०१७ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, यांना पोहवा नितिन तरटे यांचे कडुन माहीती मिळाली की, शिवाजीनगर एसटी स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन परिसरात महिलानामे बिजना बन्या तामचीकार वय ५० वर्षे रा. भाटनगर बिल्डींग नं. ७ फ्लॅट नं. ४६ तिसरा मजला पिंपरी पुणे ही मुलींकडुन वेश्याव्यवसाय करुन घेत आहे.

या अनुषंगाने सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा पुणे शहर यांचे पथक तसेच शिवाजीनगर पोलीस स्टेशन कडील स्टाफ असे संयुक्त पथकाने मिळालेल्या बातमीची खात्री केली असता महिलानामे बिजना तामचीकार हिने एक अल्पवयीन मुलगी व एक सज्ञान मुलगी वेश्याव्यवसायासाठी पोलीसांनी पाठविलेल्या बनावट गि-हाईकाकडे त्याचेकडुन पैसे घेवुन मुलगी ताब्यात देत असताना छापा टाकुन बिजना बन्या तामचीकार वय ५० वर्षे रा. भाटनगर बिल्डींग नं. ७ फ्लॅट नं. ४६ तिसरा मजला पिंपरी पुणे हिस ताब्यात घेवुन हिचे विरुध्द शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुरनं.३५३/२०१७ भादवि कलम ३७०, ३७०(अ), सह इटपा ॲक्ट क. ४, ५ व पोक्सो अधिनियम सन २०१२ चे कलम १२ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास शिवाजीनगर पोलीस स्टेशनकडे सुपुर्त केला आहे.

**वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, सपोनि शीतल भालेकर, सपोनि चंद्रकांत जाधव, नामदेव शेलार, नितिन तरटे, प्रमोद म्हेत्रे, ननिता येळे, कविता नलावडे, नितिन तेलंगे, गीतांजली जाधव, राजेद्र उंबरे, सुनिल नाईक, प्रदिप शेलार, सचिन कदम, राजेद्र कचरे, अनुराधा ठोंबरे, रुपाली चांदगुडे, सरस्वती कागणे, सुप्रिया शेवाळे, सचिन शिंदे यांनी व शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे सपोनि श्री.बनसोडे, यांनी केलेली आहे.**